Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 207 – 211
DOI: 10.5281/zenodo.10115468

Original Research Article

# महात्मा गांधी यांचे समाजवादा संबंधी विचार : एक चिकीत्सक अभ्यास

प्रा. डॉ. रामकिशन गुंडीबा चाटे

विभाग प्रमुख तथा संशोधन मार्गदर्शक, इतिहास विभाग, सरस्वती कला महाविद्यालय, किनवट ता. किनवट जि. नांदेड ४३१८०४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: ramgchate@gmail.com

Received: 15 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

भारतीय राष्ट्रीय आंदोलनात महात्मा गांधी यांच्या समाजवादी विचारांची सुरूवात म्हणजे एका नव्या युगाची सुरूवात आहे. सत्य, अहिंसा, असहकार, सत्याग्रह, राज्यविहीन समाज, वर्गसहयोग, स्ट्रस्टिशिप, रामराज्य, समानता या तत्वांना भारतीय समाज व्यवस्थेमध्ये प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न करणारे अध्यात्मिक-धार्मिक तत्वज्ञानातून मानवी ऱ्हदय परिवर्तन घडवुन आणनारे ग्रामस्वराज्य संकल्पना साकार करण्यासाठी प्रयत्न करणारे एक महान समाजवादी होते.

महात्मा गांधी यांच्या मते “मला जेवढे माहीत आहे त्यानुसार समाजवाद एक सुंदर शब्द आहे. समाजवादामध्ये समाजातील सर्व लोक समान आहेत. कोणी छोटा व मोठा नाही. मानवी शरिरातील सर्वात उंच डोके हे उगीचच नाही. तसेच जमीनीला टेकुन तळपाय राहावा म्हणुन ते खाली नाही. ज्याप्रमाणे शरिराचे सर्व हिस्से समान आहेत त्या प्रमाणे समाजाचे सदस्य समान आहेत”[1]

सन 1915 ला महात्मा गांधी यांनी भारतीय राजकारणात प्रवेश केला. त्यानी आपल्या जीवनातील 21 वर्षे दक्षिण आफ्रिकेत वास्तव्य केले. त्यांनी येथे रंगभेद, वसाहतवाद, साम्राज्यवादाच्या अन्यायाविरूध्द संघर्ष केला. अहिंसा व सविनय आंदोलन विकसित केले. फेब्रु. 1916 ला बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या उदघाटना प्रसंगी भारतीय राजांनी बांधलेल्या मोठया भवनाबददल आपले मत व्यक्त केले कि, श्रीमंत लोक आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करतात सुखात जीवन जगतात “जब भी मै सुनता हु कि भारत के किसी बडे शहर में कोई विशाल भवन खडा हो रहा है तो मै तुरंत ईर्ष्यालु हो उठता हुँ और कहता हुँ की अरे यह तो वह धन है जो किसानो से लिया गया है”[2] या विधानामधून त्यांच्या समाजवादी

विचारांचे पाळेमुळे कीती खोल रूजलेले आहेत हे लक्षात येते. याच वाक्याचा आधार घेवून या विषयाची मांडणी पुढील प्रमाणे केलेले आहे.

**सारांश**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये महात्मा गांधी यांनी मांडलेल्या समाजवादी विचारावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. यामध्ये वर्णव्यवस्थेवर भर तर वर्ग व्यवस्थेस विरोध, ऱ्हदयपरिवर्तनाद्वारे राज्यविहीन समाजाची निर्मिती, भांडवलशाहीचा समाजासाठी वापर, अध्यात्मिक, अहिंसेवर भर, खेडयांना विकेंद्रीकरणास महत्व, लघु व कुटीर उद्योगांना महत्त्व, मर्यादित राज्य सत्ता इ. घटकांवर दृष्टीक्षेप टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**गृहीतकृत्य**

1. महात्मा गांधी यांच्या समाजवादी विचारातून व्यक्तिचे कोणत्याही परिस्थितीत शोषण थांबेल.
2. समानतेच्या आधारावर सर्वांना न्याय हक्क मिळावे. श्रेष्ठ, कनिष्ठ असा भेद मिटावा.
3. ऱ्हदय परिवर्तनाद्वारे समाजाचा विकास करणे शक्य आहे.

**संशोधनाचा उददेश**

1. महात्मा गांधी यांच्या समाजवादी विचारांचा इतिहास जाणून घेणे.
2. भारतीय समाज जीवनाचा अभ्यास करणे.
3. महात्मा गांधी यांच्या समाजवादी विचारांची प्रस्तुतेचा आढावा घेणे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या तथ्य संकलनासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. त्यासाठी इंटरनेट माध्यमातून उपलब्ध माहिती, महात्मा गांधी यांची विविध पुस्तके व मासिके अनेक प्रकाशित लेख सदर तसेच विषया संदर्भातील अनेक लिखान शासनाच्या विविध प्रकाशनातील सुचनांची माहिती याचा अवलंब करण्यात आलेला आहे.

**समाजवादा बददलचे विचार**

महात्मा गांधी अहिंसक मार्गाने समाजवादाची स्थापना करणारे समाजवादी होते. त्यांचा हिंसक क्रातीच्या मार्गावर विश्वास नव्हता. समाजवादातून त्यांनी व्यक्तिला आत्मनिर्भरतेवर भर दिला. समाजाील प्रत्येक व्यक्ति हा चारित्रयवान सदगुणांनी युक्त असेल तेव्हा समाजवादाचे ध्येय साध्य होऊ शकते. त्यावेळेसच राज्यविहीन समाजाची निर्मिती होऊ शकते प्रत्येक नागरीक स्वयंशासीत असेल. स्वार्थ नसेल जनप्रतिनिधी केवळ जनकल्यानाचे निस्वार्थ भावनेने कार्य करतील त्यांना कोणत्याच प्रकारचे वेतन मिळणार नाही निस्वार्थ सेवा असेल.

**वर्ग संघर्षापेक्षा सामंजस्यावर भर**

महात्मा गांधीनी वर्ग संघर्षापेक्षा वर्ग सामंजस्यावर भर देतात त्याला अद्वैतवाद म्हणून त्यांनी संबोधित केले. त्यांच्या मतानूसार समाजवादामध्ये राजा व प्रजा, अमीर आणि गरीब, मालक आणि मजदूर सर्व एकाच पातळीवर असतात. धर्माच्या भाषेत सांगितले तर समाजवादामध्ये द्वैत भेदभाव नसतो सर्वत्र एकता, अद्वैत यांचे प्रभुत्व असते.

कार्ल मार्क्स यांनी समाज व समुहास महत्व दिले. महात्मा गांधी यांनी समाजासोबतच व्यक्तीच्या कल्याणाकडे देखील लक्ष दिले. व्यक्तिजीवनामधील सत्य, अहिंसा, सत्याग्रह, प्रतिरोध या करिता आत्म्याच्या शक्तिला महत्व दिले. याद्वारे शत्रुचे ऱ्हदय परिवर्तन होते असे त्यांचे मत होते.

गांधीचे विचार आणि साम्यवाद दोन्ही क्रांन्तीकारी विचारधारा आहेत. साम्यवादामध्ये आपली ध्येयप्राप्ती वरच्या स्तरापासून सुरूवात होते तर गांधी विचारामध्ये त्या विपरीत खालच्या पातळीपासून सुरूवात होते. सर्वात प्रथम मनुष्याच्या ऱ्हदयपरिवर्तनावर भर देण्यात येतो. ऱ्हदय परिवर्तनातून आत्मनिर्भर चारित्रवान, प्रगत बनविण्यावर भर दिला.

**प्रेम-अहिंसा, व्यक्ति स्वातंत्र्यावर भर**

महात्मा गांधी यांच्या विचारांमध्ये अहिंसा हे एक शाश्वत सिध्दांत आहे. जो प्रत्येक काळ, स्थान, परिस्थिती मध्ये आवश्यक आहे. त्यांच्या मतानुसार "सारा समाज अहिंसापर उसी प्रकार कायम है, जिस प्रकार गुरूत्वाकर्षनसे पृथ्वी अपनी स्थिती पर टिकी हुई है | लेकिन जब गुरूत्वाकर्षन नियम का पता लगा इसा शोध के ऐसे परिणाम निकले जिनके बारेमे हमारे पूर्वजों को कोई ज्ञान नही था । इसी प्रकार जब निश्चित रूप से अहिंसा के नियमानुसार समाज का निर्माण होगा जो उसका ढांचा खास-खास बातों मे आज से भिन्न होगा ॥"[3]

गांधीच्या मतानुसार "प्रेम हि वह कानुन है जिससे मानवी समुदाय शासित होता है । हिंसा अर्थात घृणा का साम्राज्य रहा होता तो हम कभी के लुप्त हो गये होते और फिर भी दु:ख की बात यह है कि सभ्य कहे जाने वाले पुरूष और राष्ट्र अपने आचरण ऐसे रखते है मानो समाज का आधार हिंसा हो । प्रेम ही जीवन का श्रेष्ठ और एकमात्र कानून है और यह सिध्द प्रयोग करने मे मुझे अकथनीय आनन्द आता है ।"[4]

"गांधी वैयक्तिक स्वतंत्रता को भी पूर्ण समर्थन देते थे तथा व्यक्ति पर किसी भी प्रकार के बाहय नियंत्रण के विरोधी थे । उनके विचार से व्यक्ति हि सर्वोपरी है, उसके विकास में हि मानवता का भविष्य निहीत है ।"[5]

"गांधीजींनी व्यक्ति आणि समाजा मधील संघर्षला नाही तर सामंजस्याला सत्य मानले व्यक्तिने आपल्या श्रेष्ठता, स्वार्थ, सुख, सुविधे करीता समाजाची निर्मिती केली आहे. मुल वस्तु व्यक्ति आहे, समाज नाही, समाज शरिर आहे तर व्यक्ति प्राण आहे."[6] असे प्रतिपादन करून आपल्या समाजवादी विचारांची परंपरा प्रगत केली आहे.

महात्मा गांधी यांच्या मतानुसार "लोक आपल्या हातापायानी सर्व कामे करतील, आपले अंतरून गोळा करेल, आपली कपडे धुतील, आपल्या आई-बहिणींना भांडे धुण्यास मदत करतील व दररोज कटाई करेल ज्यामुळे आवश्यकतेनुसार कापड मिळत राहील हे समाजवादी दिशेतील एक पाउल असेल."[7]

व्यक्ति कि स्वतंत्रता के पक्ष पोषक होते हुए भी गांधी व्यक्ति की निरंकुशता का समर्थन नही करते थे

व्यक्तिच्या स्वातंत्र्याचे समर्थक असुन देखील त्यांनी कधी व्यक्तिच्या निरंकुशतेचे समर्थन कधीही केले नाही त्यांच्या शब्दांत "अनियंत्रित व्यक्तिवाद जंगली जनावरो का कानुन है। हमे व्यक्तिगत स्वातंत्र और सामाजिक संयम के बीच के रास्ते पर चलना सिखना होगा। हमारे समाज कि भलाई के लिए सामाजिक संयम को खुशीसे मानना। व्यक्ति और समाज जिसका सदस्य व्यक्ति है, दोनो को समृध्द करता है।"[8]

## सर्वोदयातून समाजवाद

"गांधीच्या विचारातील सर्वोदयामध्ये अर्थव्यवस्थेत राज्याच्या विभिन्न अंगांना विकेंद्रित व स्वावलंबी बनविणे हा मुळ हेतु आहे. या विचारानुसार प्रत्येक गावाने आपल्या गरजेनुसार उत्पन्न घ्यावे जी गावे उत्पन्न करू शकत नाहीत त्यांनी उद्योगाद्वारे उत्पन्न मिळवावे जी गावे संघटीत करणे शक्य नाही अशा ग्रामास केंद्राने आपल्याकडे घ्यावे."[9]

त्यांनी औद्योगीकीकरणाचा विरोध केला ग्रामीण लघु उद्योगांना महत्व दिले. त्यांच्या मते "यांत्रीकरण उस समय ठिक है जब काम करणे के लिए हाथ थोडे हो किन्तु यह उस स्थिती में ठिक नहीं है, जब काम करणे के लिए आवश्यकता से अधिक हाथ हो, जैसा कि भारत में देखने को मिलता है।"[10]

विनोबा भावे यांच्या मतानुसार गांधीवाद व साम्यवाद यामध्ये केवळ साधनांचाच नाही तर दोघांमध्ये तात्वीक फरक देखील आहे. अहिंसे बदलच त्यांचे असे म्हणणे होते की, दोन व्यक्ति नाक, कान, डोळे या दृष्टीने एक समान होते. यांच्यात साम्य एवढे होते की, त्यांना जर राजकिय पक्षामधील निवडणुकीत एकाच्या जागी दुसऱ्याला बसविल्या जाऊ शकते परंतू यामध्ये फरक एवढा होता की, एकाच्या नाकातून श्वास चालू होता तर दुसऱ्याचा श्वास बंद झालेले होते. परिणाम हा झाला की एकासाठी जेवणाची तयार होऊ लागली तर दुसऱ्यासाठी शवयात्रेची तयारी होऊ लागली."[11]

महात्मा गांधी सर्वोदय संकल्पनेमध्ये विकेंद्रीकरणावर भर देण्यात आलेला आहे. त्यांच्या मते केंद्रीकरणामुळे शोषन व असमानतेमध्ये वाढ होते. केंद्रीकरणामुळे जीवन कठिण बनते व्यक्ति स्वातंत्रयास मारक आह. यामुळे व्यक्तिच्या नैतिक भावनेला ठेस पोहोचेल.

## रामराज्यातून समाजवाद

महात्मा गांधी यांचे सामाजिक ध्येय रामराज्य म्हणजे ईश्वरीय राज्याची निर्मिती करणे होते. यासाठी व्यक्तिच्या नैतिक गुणांचा विकास महत्वाचा आहे. तोच त्याचा पाया व आधार आहे. प्रत्येक व्यक्तिने आपल्या अंतरंगात पृथ्वीवरील ईश्वरीय राज्याचा अनुभव करावा आणि आपल्या आत्म्याच्या आवाजानुसार वागावे. कार्ल मार्क्स यांनी प्रतिपादीत केलेल्या राज्यविहिन समाजाप्रमाणेच महात्मा गांधी यांच्या रामराज्याची संकल्पना आहे. केवळ त्याचा आधार व रूप मात्र वेगळे आहे. महात्मा गांधीच्या मते राज्यविहीन समाज लष्करी शक्तिच्या अभावी केवळ नागरीकांच्या आपल्या चांगल्या चरित्रगुणांच्या आधारावरच टिकवुन ठेऊ शकतात. त्यासाठी नागरीकांमध्ये प्रेम, कर्तव्य व त्यागाची भावना तसेच दुसऱ्यांच्या अधिकाराप्रती सन्मानाने प्रेरीत असेल या गुणांनी पुर्ण असलेला व्यक्ति स्वार्थ, लालसा आणि शक्तीच्या पदापासून दुर राहिल. जर या उंची पर्यत ते येऊ शकले नाहीत तर ते घडीची सुई पुन्हा उलट दिशेने फिरवून आपल्याला

राजा हुकुमशहा म्हणुन घोषीत करतील. त्यामुळे समाज हा राज्यविहिन असो का रामराज्य त्याचे अस्तित्व नागरीकांच्या नैतिक गुणांच्या प्रगतिवर आधारीत आहे."[12]

**निष्कर्ष**

१. महात्मा गांधीच्या विचारांचा स्विकार केला तर समाजात होणारे व्यक्तिचे मोठे शोषन समाप्त होईल.

२. गांधीचा समाजवाद प्रेम, अहिंसा, सत्य व परस्पर सहकार्यावर आधारीत आहे जी आजच्या युगाची खरी गरज आहे.

३. अध्यात्मिक, धार्मिक ज्ञानातून मानवतावादाचा विकास करणे शक्य आहे.

४. व्यक्तिच्या ऱ्हदय परिवर्तनाद्वारे समाज परिवर्तन होऊ शकते.

५. जनतेला विकासनिधी हा केवळ खासदार व आमदार, सरपंच यांच्या पुरताच मर्यादीत न ठेवता त्याचा विस्तार करावा.

**संदर्भ सूची**

१. Quoted by Vishnoo Bhagwa, Indian Political thinkers, Op. Cit. P.134

२. यंग इंडिया, 31 डिसे, 1919

३. हरिजन सेवक (गांधी), 11 फेब्रु. 1939, प्रृ. 418

४. वही, 20 एप्रिल 1940, पृ. 82-83

५. दिक्षीत गोपीनाथ, गांधीजी कि चुनौती, कम्युनिझको, सन 2006, पृ. 57

६. सुमन रामनाथ, गांधीवाद की रूपरेषा, साधना सदन इलाहाबाद, पंचम संस्करण, 1951, पृ.76

७. Shriram Narayan, Relevance of Gandhi an Economics Journal of Gandhi an Studies, Gandhi Bhawan, Unit of Allahabad, Vol. 5.no

८. गांधी हरिजन, दि. 27/05/1939

९. सुद ज्योतिप्रसाद, प्रमुख राजनितिक विचारक, केनाध ॲण्ड कंम्पणी, मेरठ, अष्ठम संस्करण, 1962, पृ. 63

१०. गांधी हरिजन, 23/03/1947

११. भावे विनोबा, सर्वोदय और साम्यवाद, सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी, तृतीय संस्करण.1970, पृ. 15

१२. झा राकेश कुमार, गांधीय चिन्तन मे सर्वोदय, पॉईन्टर पब्लिकेशर्स जयपुर, प्रथम संस्करण, 1995. पृ. 105